(नॅकद्वारे A+दर्जा)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

विद्यार्थी विकास

## : परिपत्रक :

सर्व संलग्नित महाविद्यालय व सर्व शैक्षणिक विभाग प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री आणि राजभवन कार्यालयाद्वारे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला अद्वितीय स्थान प्राप्त आहे. हे गीत बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचल्याच्या घटनेला दि. ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने **'वंदे मातरम् सार्धशताब्दी महोत्सव'** आयोजित करण्यात येत आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची प्रेरणा, इतिहासाची जाणीव व सांस्कृतिक अभिमान वृध्दिंगत करण्यासाठी विद्यापीठाद्वारे निबंध लेखन, वक्तृत्व, चित्रकला व रिल्स निर्मिती स्पर्धांचे आयोजन केले आहे. याविषयी स्पर्धानिहाय माहिती सोबत जोडली आहे. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण **'वंदे मातरम् सार्धशताब्दी सोहळा'** या कार्यक्रमात **दि. ७ नोव्हेंबर** २०२५ रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. करिता मा. विभाग प्रमुख / मा. प्राचार्यांना विनंती आहे की, सदरील परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

विद्यापीठ प्रांगण ♦
छत्रपती संभाजीनगर ♦
संदर्भ क्र : सविवि/२०२५/22006-22542 ♦
दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५ ♦

**संचालक**
विद्यार्थी विकास मंडळ

**याची एक प्रत माहितीस्तव :**

१) मा. कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
३) मा. कुलसचिव कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
४) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
५) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

# वंदे मातरम् सार्धशताब्दी वक्तृत्व स्पर्धा

- वंदे मातरम् सार्धशताब्दी वक्तृत्व स्पर्धा विद्यापीठात दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरु होईल.
- या स्पर्धेत एका महाविद्यालयातून केवळ दोन विद्यार्थी सहभागी होवू शकतील. त्यापैकी एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनी असावे.
- स्पर्धक विद्यार्थ्यांचे नाव प्राचार्यांद्वारे विद्यार्थी विकास विभागास दि. २ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत dsw@bamu.ac.in या ई-मेलवर पाठविण्यात यावे.
- **वक्तृत्व स्पर्धेचे विषय :** १) देशभक्तीची प्रेरणा-वंदे मातरम्
  २) भारतीय संस्कृतीचा आत्मा-वंदे मातरम्
  ३) भारतीय स्वाभिमानाचे प्रतिक-वंदे मातरम्
- स्पर्धकांस वरीलपैकी कोणत्याही एका विषयावर आपले विचार मांडता येतील.
- स्पर्धेची वेळ पाच (५) मिनिटे + दोन (२) मिनिटे असेल. पाच (५) मिनिटानंतर एक (१) वॉर्निंग बेल वाजवण्यात येईल. वेळ संपल्यानंतर दीर्घ बेल वाजवण्यात येईल.
- स्पर्धकांना केवळ सात (७) मिनिटातच विषयाची मांडणी करावयाची आहे.
- स्पर्धकाने स्पर्धेच्या ठिकाणी जाण्या-येण्याचा खर्च त्या-त्या संस्थेने करावा.
- स्पर्धकांना मराठी हिंदी व इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत विचार मांडता येतील.
- स्पर्धकांना कोणत्याही प्रकारचा कागद, चिठ्ठी सोबत ठेवता येणार नाही. असे आढळल्यास संबंधित स्पर्धकास बाद करण्यात येईल.
- सोबत विद्यापीठ किंवा महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.
- ही स्पर्धा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय व विभागातील विद्यार्थ्यांकरिता आहे.
- **वक्तृत्व स्पर्धा - पारितोषिक स्वरुप :**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु. ३०००/- व प्रमाणपत्र |
| द्वितीय पारितोषिक | रु. २०००/- व प्रमाणपत्र |
| तृतीय पारितोषिक | रु. १०००/- व प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | रु. ५००/- व प्रमाणपत्र |

- स्पर्धेच्या निकालाबाबत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल.

# वंदे मातरम् सार्धशताब्दी निबंध स्पर्धा

- वंदे मातरम् सार्धशताब्दी निबंध स्पर्धेचा कालावधी दि. १४ ऑक्टोबर २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ आहे.
- या स्पर्धेत एका महाविद्यालयातून केवळ एक विद्यार्थी सहभागी होवू शकेल.
- स्पर्धकाने खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध प्राचार्यांद्वारे विद्यार्थी विकास विभागास दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत dsw@bamu.ac.in या ई-मेलवर पीडीएफ स्वरुपात पाठवावा.
- **निबंध स्पर्धेचे विषय :** १) देशभक्तीची अमरज्योत-वंदे मातरम्
  २) भारतीय स्वातंत्र्याची प्रेरणा-वंदे मातरम्
  ३) वंदे मातरम् – काल, आज आणि उद्या
- स्पर्धकांना वरीलपैकी कोणत्याही एका विषयावरील स्वहस्ताक्षरातील स्वलिखीत २००० शब्दापर्यंतचा प्राचार्यांनी अधिकृत केलेला निबंध ग्राह्य धरण्यात येईल.
- स्पर्धकांना मराठी हिंदी व इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत निबंध लिहिता येईल.
- निबंधाच्या फाईलसोबत विद्यापीठ किंवा महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे.
- ही स्पर्धा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय व विभागातील विद्यार्थ्यांकरिता आहे.
- **निबंध लेखन स्पर्धा - पारितोषिक स्वरुप :**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु. ३०००/- व प्रमाणपत्र |
| द्वितीय पारितोषिक | रु. २०००/- व प्रमाणपत्र |
| तृतीय पारितोषिक | रु. १०००/- व प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | रु. ५००/- व प्रमाणपत्र |

- स्पर्धेच्या निकालाबाबत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल.

# वंदे मातरम् सार्धशताब्दी चित्रकला स्पर्धा

- वंदे मातरम् सार्धशताब्दी चित्रकला स्पर्धेचा कालावधी दि. १४ ऑक्टोबर २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ आहे.
- या स्पर्धेत एका महाविद्यालयातून केवळ दोन विद्यार्थी सहभागी होवू शकतील.
- स्पर्धकाने **वंदे मातरम् राष्ट्रीय गीत** या विषयावरील देशभक्ती, इतिहास, संस्कृती, स्वातंत्र्य चळवळ, बलिदान इ. संदर्भाने चित्र काढावे.
- काढलेले चित्र प्राचार्यांच्या पत्रासह विद्यार्थी विकास विभागास दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष सादर करणे बंधनकारक आहे. सोबत स्पर्धकाच्या ओळखपत्राची छायांकित प्रत असावी.
- चित्राचा आकार हाफ इम्पीरियल साईझ ड्रॉइंग पेपर (२२X१५ इंच) असावा.
- चित्र ऑईल, वॉटर, पोस्टर किंवा पेस्टल रंगामध्ये साकारता येईल.
- ही स्पर्धा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय व विभागातील विद्यार्थ्यांकरिता आहे.
- **चित्रकला स्पर्धा - पारितोषिक स्वरुप :**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु. ३०००/- व प्रमाणपत्र |
| द्वितीय पारितोषिक | रु. २०००/- व प्रमाणपत्र |
| तृतीय पारितोषिक | रु. १०००/- व प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | रु. ५००/- व प्रमाणपत्र |

- स्पर्धेच्या निकालाबाबत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल.

# वंदे मातरम् सार्धशताब्दी रिल्स/शॉर्ट व्हिडिओ स्पर्धा

- वंदे मातरम् सार्धशताब्दी रिल्स/शॉर्ट व्हिडिओ स्पर्धा दि. १४ ऑक्टोबर २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे.
- या स्पर्धेत एका महाविद्यालयातून केवळ दोन विद्यार्थी सहभागी होवू शकतील.
- स्पर्धकाने **वंदे मातरम् राष्ट्रीय गीत** या विषयावरील देशभक्ती, इतिहास, संस्कृती, स्वातंत्र्य चळवळ, बलिदान इ. संदर्भाने रिल्स /शॉर्ट व्हिडिओ तयार करावे.
- रिल्स/शॉर्ट व्हिडिओचा कालावधी कमीत-कमी ३० सेकंद व जास्तीत जास्त १ मिनिटांपर्यंत असावा.
- रिल्स/शॉर्ट व्हिडिओ MPEG4 किंवा AVI फॉरमॅटमध्ये असावे.
- रिल्स/शॉर्ट व्हिडिओद्वारे कोणतीही व्यक्ती, समाज, धर्म, पंथ, संप्रदाय, राजकीय पक्ष इ. विषयी वैयक्तिक टिप्पणी, द्वेषपूर्ण भाषा किंवा धार्मिक टीका, निंदा, नालस्ती, कोणाची बेइज्जती इ. असू नये, असे आढळल्यास सदरील रिल्स/शॉर्ट व्हिडिओ बाद करण्यात येईल.
- तयार केलेली रिल्स/शॉर्ट व्हिडिओ प्राचार्यांच्या पत्रासह विद्यार्थी विकास विभागास दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत dsw@bamu.ac.in या ई-मेलवर पाठविणे बंधनकारक आहे.
- सोबत विद्यापीठ किंवा महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. ही स्पर्धा केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय व विभागातील विद्यार्थ्यांकरिता आहे.
- **चित्रकला स्पर्धा - पारितोषिक स्वरुप :**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु. ३०००/- व प्रमाणपत्र |
| द्वितीय पारितोषिक | रु. २०००/- व प्रमाणपत्र |
| तृतीय पारितोषिक | रु. १०००/- व प्रमाणपत्र |
| उत्तेजनार्थ पारितोषिक | रु. ५००/- व प्रमाणपत्र |

- स्पर्धेच्या निकालाबाबत अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल.